महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २९४ वा | दिनांक : २२/०९/२०२५ | वार : सोमवार

## मोदींनी गेल्या ८ वर्षांच्या 'लूट महोत्सवाची' जबाबदारी घ्यावी : हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात पुन्हा एकदा आपल्या सवयीप्रमाणे जीएसटी दर कपातीचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला. २०१७ मध्ये मोदीजींनीच स्वतः प्रचंड वाढीव दराने जीएसटी आणून देशातील उद्योग, व्यापारी आणि सामान्य नागरिक यांना त्रस्त केले, त्यांची प्रचंड आर्थिक लूट केली. तेच मोदीजी आज जीएसटी दर कमी केले म्हणून स्वतःची पाठ थोपटून घेत आहेत. गेल्या आठ वर्षांत जीएसटी संकलन दुप्पट वाढून २२ लाख कोटींवर गेले आहे आणि याचा सर्वाधिक फटका ग्राहक व छोट्या व्यवसायांना बसला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दर कमी करण्याचे श्रेय घेताना आठ वर्ष वाढीव दराने केलेल्या लुटीची जबाबदारीही घेतली पाहिजे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, राहुल गांधी यांनी खूप आधीच सांगितले होते की मोदींजींनी जीएसटीला गब्बर सिंग टॅक्समध्ये परिवर्तित केले आहे. दर कमी करून जनतेची लूट थांबवा अशी मागणीही त्यांनी सातत्याने केली होती. त्यावर निर्णय घ्यायला मोदींनी काही वर्ष उशीर केला. पेट्रोल-डिझेलच्या दरांवर मात्र मोदीजी गप्प आहेत. जनतेला स्वदेशीचा उपदेश करणारे पंतप्रधान स्वतः परदेशी गाड्या, घड्याळे, पेन व फोन वापरतात. 'आत्मनिर्भरते'ची शिकवण देताना स्वतः मात्र ऐषआरामी जीवनशैलीत गुंतलेले आहेत. त्यांनी आज सांगितले की हा बचत महोत्सव आहे मग गेली आठ वर्ष काय लूट महोत्सव सुरु होता का? हेही त्यांनी सांगावे.

त्यांच्या आजच्या भाषणात उत्साह आणि आत्मविश्वासाची कमी होती. कदाचित देशभर घुमणारे "वोट चोर, गद्दी छोड"चे नारे आणि जनतेत वाढत चाललेली नाराजी याचेच ते प्रतिबिंब असावे. पंतप्रधानांनी लोकांची दिशाभूल करणाऱ्या भाषणांपेक्षा महागाई, बेरोजगारी, शेती व शेतक-यांचे प्रश्न सोडवण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## पंतप्रधान म्हणाले उद्यापासून बचत महोत्सव

**मुंबई :** देशात आता नवीन जीएसटीचे दर उद्यापासून (२२ सप्टेंबर) लागू होणार आहेत. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित करताना नवीन जीएसटी धोरणावर भाष्य केले आहे. २२ सप्टेंबर रोजी सूर्योदयासह जीएसटी बचत महोत्सव सुरू होईल. समाजातील सर्व घटकांना याचा फायदा होईल. पंतप्रधानांनी जनतेला फक्त देशवासीयांच्या कठोर परिश्रमातून बनवलेल्या वस्तू खरेदी करण्याचे आवाहन केले. यावरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रतिक्रिया दिली असून हे देशातील क्रांतिकारी पाऊल असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

नवीन जीएसटी धोरणवार बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, जीएसटीचे सेकंड जनरेशन रिफॉर्म्स हे या देशातील क्रांतिकारी पाऊल आहे. यामुळे सामान्य माणसाला लागणाऱ्या ज्या वस्तू आहेत, ज्याच्या किंमती कमी होणार आहेत, कारण त्याच्यावरील जीएसटी कमी करण्यात आला आहे. दुसरीकडे देशांतर्गत मागणी वाढणार आहे. देशांतर्गत प्रॉडक्शन वाढणार आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. विशेषतः आत्मनिर्भर भारतकडे जो आपला प्रवास आहे तो या सेकंड जनरेशनच्या माध्यमातून प्रधानमंत्र्यांनी सुरू केलेला आहे. त्यामुळे मी तमाम भारतीयांच्या वतीने मोदीजींचे आभार मानतो, अशी प्रतिक्रिया फडणवीस यांनी दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावर आधारित मेरा देश पहले हा कार्यक्रम मनोज मुंतशीर यांच्या संकल्पनेतून आज मुंबईत होणार आहे. यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'मेरा देश पहले', हा मनोज मुंतशीर यांनी संकल्पित केलेला कार्यक्रम अतिशय हृदयस्पर्शी आणि संवेदनशील असा कार्यक्रम आहे. मोदीजींच्या जीवनातले जे प्रसंग लोकांना माहिती नाहीत, नरेंद्र मोदी नावाचे व्यक्तिमत्व कसे घडते, कशाप्रकारे ही विचारसरणी तयार होते, त्या साठी किती कष्ट घेतले जातात ही एक आधी न सांगितलेली कथा, ही या कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजापुढे येत आहे. देशातील सहा महानगरांमध्ये हा कार्यक्रम होत आहे. त्यातला मुंबईतला कार्यक्रम आज आहे. आम्ही देखील सगळे हा कार्यक्रम पाहण्यासाठी उत्सुक आहोत.

# महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्र्यांचे अकाउंट हॅक



**मुंबई :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ट्विटर अकाउंट रविवारी सकाळी हॅक झाले होते. हॅकर्सनी त्यांच्या सोशल मीडिया हँडलवर पाकिस्तान आणि तुर्कीच्या झेंड्यांचे फोटो पोस्ट केले होते. शिंदे यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी तात्काळ सायबर क्राइम पोलिसांना कळवले. तक्रार मिळाल्यानंतर ३० ते ४५ मिनिटांत त्यांनी अकाउंटवर नियंत्रण मिळवल्याचे त्यांच्या पथकाने सांगितले आहे. महाराष्ट्र सायबर सेल या प्रकरणाची चौकशी करत असून हॅकिंगमागील लोकांची ओळख पटवण्याचा प्रयत्न करत आहे. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की हॅकिंग दरम्यान कोणतीही संवेदनशील माहिती शेअर केली गेली नव्हती. अकाउंट आता पूर्णपणे सुरक्षित आहे आणि सामान्यपणे कार्यरत आहे.

भारतात हॅकिंग आणि सायबर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. २०२४ मधील प्रमुख घटनांमध्ये वझीरएक्स क्रिप्टो एक्सचेंजवर २३० दशलक्ष डॉलर्सचा हॅकिंग, बीएसएनएल डेटा उल्लंघन आणि स्टार हेल्थ येथे ७.२४ टीबी डेटा लीकचा समावेश आहे. हे सायबर हल्ले प्रामुख्याने दूरसंचार, वित्त, आरोग्यसेवा आणि ऊर्जा क्षेत्रांना लक्ष्य करत आहेत. २०२५ मध्ये एआय-संचालित घोटाळे आणि रॅन्समवेअर आणखी वाढण्याची शक्यता आहे.

डिजिटल व्यवहारांमध्ये वाढ, एआयचा गैरवापर आणि भू-राजकीय तणाव (जसे की पाकिस्तानशी संबंधित गट) ही सायबर गुन्ह्यांची मुख्य कारणे आहेत. संशयास्पद लिंक्सवर क्लिक करणे टाळा, मजबूत पासवर्ड वापरा आणि ताबडतोब १९३० वर कॉल करा किंवा cybercrime.gov.in वर फसवणुकीची तक्रार करा. सरकारने I4C आणि CERT-In द्वारे पावले उचलली आहेत, परंतु जागरूकता वाढवणे आवश्यक आहे.

लालू यादव यांचे मोठे पुत्र आणि राजद आमदार तेज प्रताप यादव यांचे फेसबुक अकाउंट 24 मे रोजी हॅक करण्यात आले. तेज प्रताप यादव एका मुलीसोबत असल्याचे दाखवणारी पोस्ट करण्यात आली. नंतर तेज प्रताप यांनी दावा केला की त्यांचे अकाउंट हॅक करण्यात आले आहे. या वर्षी 2 मार्च रोजी श्रेया घोषालने इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत अकाउंट हॅक झाल्याचे उघड केले. तिने लिहिले की 13 फेब्रुवारीपासून तिचे अकाउंट हॅक झाले आहे. पोस्टमध्ये तिने सोशल मीडिया वापरकर्त्यांना सल्ला देखील दिला होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ सप्टेंबर २०२५

## जनार्धन पाटील गवळी यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा संघटनाला बळकटी देण्यासाठी पक्षाचे ज्येष्ठ व निष्ठावान कार्यकर्ते श्री. जनार्धन पाटील गवळी यांची जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षाचे जिल्हाध्यक्ष मा. आ. सतीशभाऊ चव्हाण (B.E. Mech.) यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.नियुक्तीपत्र देताना श्री. चव्हाण म्हणाले की, "जनतेतून उभ्या राहिलेल्या, सदैव कार्यकर्त्यांमध्ये राहून जनतेच्या प्रश्नांवर लढा देणाऱ्या जनार्धन पाटील गवळी यांच्यासारख्या कार्यकर्त्यांची संघटनेला नितांत गरज आहे.

त्यांच्या नियुक्तीमुळे शहर व ग्रामीण भागात पक्षाचे कार्य अधिक जोमाने पुढे नेले जाईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला

# ज्ञानेश्वर विद्यालयाचा राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत द्वितीय क्रमांक




**बेगमपुरा :** विवेकानंद शिक्षण संस्था संचालित ज्ञानेश्वर विद्यालय, बेगमपुरा यांनी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयोजित "छोटे उस्ताद – हम होंगे कामयाब" या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत परीक्षक म्हणून राज्य नाट्य परिषद मुंबईचे श्री. शेख अन्सार सर तसेच विद्यापीठ नाट्य विभागाचे श्री. आफळे सर यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे मुख्य आयोजक म.न.पा. सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. शंभू विश्वासू होते.

बक्षीस वितरण समारंभात माननीय उप आयुक्त श्री. लखीचंद चव्हाण सर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व रोख बक्षीस □ प्रदान करण्यात आले.

या यशामागे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांचे मार्गदर्शन, पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे, ज्येष्ठ शिक्षिका श्रीम. मंगल पवार, श्रीम. मंगला सुलताने व श्रीम. आरती बिरोटे यांचा मोलाचा सहभाग राहिला.विद्यार्थ्यांनी "सुंदर माझं गाव" ही नाटिका श्रीम. मंगला सुलताने यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केली.

या नाटकात साई कुसाळे, आर्यन टोंगराज, सिद्धी जाधव, सौंदर्या मालकर,मेघा पुसे,गीताश्री काकडे, वरद शिंदे, मयूर सले, रुद्राश घल्डे, अभिमन्यू मालकर, रुपम पंडुरे आदी विद्यार्थ्यांनी अप्रतिम भूमिका साकारल्या. नेपथ्य सजावटीचे उत्कृष्ट काम श्री. गणेश काथार यांनी केले असून त्यांच्या परिश्रमामुळे विद्यालयाने नेपथ्य विभागात द्वितीय क्रमांक मिळवला.

या सोहळ्याला विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. मोरे, पर्यवेक्षक श्री. तांगडे तसेच सर्व मान्यवर उपस्थित होते.

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# भारतीय ज्ञान परंपरा या विषयावर राज्यस्तरीय पीपीटी स्पर्धेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** म. शि. प्र. मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालय, मराठवाडा लिगल ॲण्ड जनरल एज्युकेशन सोसायटीचे डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय आणि शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर या तीन महाविद्यालयांच्या सयुंक्त विद्यमाने शैक्षणिक सामंजस्य करारांतर्गत संस्कृत विभागातर्फे रवींद्रनाथ टागोर सभागृह देवगिरी महाविद्यालय येथे दिनांक २३-०९-२०२५ मंगळवार रोजी सकाळी ९.३० वाजता भारतीय ज्ञान परंपरा या विषयावर राज्यस्तरीय PPT स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रथम सत्रात पीपीटी स्पर्धा होईल व दुसऱ्या सत्रात १२.३० वाजता सुप्रसिद्ध लेखक, वक्ता, प्राचीन भारतीय इतिहास विषयक तज्ञ मा. श्री. निलेश ओक यांच्या व्याख्यानाचेही आयोजन करण्यात आलेले आहे.

संस्कृत भाषा ही संपूर्ण ज्ञान परंपरेचे मूळ आहे आणि म्हणूनच या भाषेमध्ये असलेल्या ज्ञानाचा परिचय नवीन पिढीला करून देण्यासाठी या पीपीटी स्पर्धेचे आयोजन केले असून मा. श्री. निलेश ओक सर हे संस्कृत भाषेचे प्रगाढ अभ्यासक असून त्यांनी महाभारताचा कालावधी निश्चित करण्यात मोठे योगदान दिले आहेत.

हे सुप्रसिद्ध व्याख्याते आहेत. भारतीय ज्ञानपरंपरेवरचे श्री. निलेश नीलकंठ ओक यांचे व्याख्यान सर्व अभ्यासून व भारतीय ज्ञान परंपरेला जाणून घेण्यासाठी उत्सुकांसाठी खुले ठेवण्यात आलेले आहे. त्यांच्या व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आव्हाहन प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई, प्राचार्य डॉ. नवल थोरात, संस्कृत विभागप्रमुख डॉ. मीनल श्रीगिरीवार, डॉ. पंकजा वाघमारे (उच्च शिक्षण विभागीय सहसंचालक), प्रा. वर्षा तुळापूरकर यांनी केले आहे.

## जि. पो. अधीक्षक निलेश तांबे यांच्या हस्ते किनगाव राजा पो. स्टे.चे ठाणेदार संजय मातोंडकर यांचा सन्मान



**बुलढाणा (महेश मुंढे) :** किनगाव राजा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार संजय मातोंडकर यांना किनगाव राजा पोलीस स्टेशनला येऊन नुकतेच काही महिने झाले आहेत इतक्या कमी कालावधीत ठाणेदार साहेबांनी नागरिकांसोबत विशेष समन्वय साधत योग्य नियोजन करून सर्व सण उत्सव शांततेत पार पाडले याच कार्याची दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे साहेब यांनी १७ सप्टेंबर २०२५ रोजी एका कार्यक्रमांमध्ये ठाणेदार संजय मातोंडकर यांना विशेष सन्मानपत्र देऊन गौरवीत केले तसेच किनगाव राजा येथील नागरिकांनीही त्यांचे कौतुक केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ सप्टेंबर २०२५


## माजी आमदार चौगुले यांनी मुरूम परिसरातील अतिवृष्टीग्रस्त भागाची केली पाहणी



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : जिल्हाधिकारी यांना व्हिडिओ कॉल च्या माध्यमातून पूर परिस्थितीची दिली माहिती.मागील आठवडाभरापासून संपूर्ण उमरगा लोहारा तालुक्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने सगळीकडे पूर परिस्थिती निर्माण झाली असून विशेषतः बेन्नीतुरा नदीच्या पात्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे नदीने धोक्याची पातळी ओलांडून नदीपात्राच्या परिसरातील हजारो हेक्टर शेतीमध्ये नदीचे पाणी शिरल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या अनुषंगाने शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी मुरूम परिसरातील पूरग्रस्त भागाची पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधला.

तसेच या सर्व परिस्थितीची माहिती धाराशिव जिल्हाधिकारी श्री.कीर्तीकिरण पुजार यांना व्हिडिओ कॉल च्या माध्यमातून देत पर्जन्यमापकाची तांत्रिक अट न धरता उमरगा लोहारा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर होणे साठी शासनाकडे प्रस्ताव पाठवणे बाबत विनंती केली.

याच दौऱ्या दरम्यान मुरूम शहरातील अनेक भागात पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात शिरल्याने दुकाने, घरे व इतर सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्याची पाहणी करत सदरची संपूर्ण परिस्थितीची माहिती राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री, कृषीमंत्री यांना अवगत करून देऊन संपूर्ण धाराशिव जिल्हा ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरीव नुकसान भरपाई मिळवून देण्याची ग्वाही शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी उपस्थित शेतकरी व नागरिकांना दिली.

यावेळी महसूल मंडळ अधिकारी श्री.माटे, सहाय्यक कृषी मंडळ अधिकारी जाधव, व्ही.एस.चाकरे, सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता श्री.संजय मंडगे, मुरूम मुख्याधिकारी सचिन भुजबळ, युवा सेना मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड, तलाठी सुदेश होनक्लास, तालुका प्रमुख बळीराम सुरवसे, भीमराव वरनाळे, शेखर मुदकन्ना, श्रीकांत मिनीयार, सुरेश मंगरुळे, भगत माळी, दत्ता इंगळे, प्रशांत पाटील, बाळू खंडागळे, पिंटू फुगटे आदी जण उपस्थित होते.

## कलाप्पा पाटील यांच्याकडून अंगणवाडीतील बालकांना शालेय साहित्याचे वाटप



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : येथील रोटरी क्लब मुरूम सिटीचे सचिव तथा कविवर्य कलाप्पा पाटील यांच्या ६० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून सुंदरवाडी, ता. उमरगा येथील अंगणवाडीतील बालकांना हनुमान मंदिर सभा मंडपात शालेय साहित्य व खाऊचे वाटप शनिवारी (ता.२०) रोजी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

वाढदिवस अभिष्टचिंतन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच हर्षवर्धन जाधव होते. यावेळी रोटरीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, सचिव कलाप्पा पाटील, रोटरीचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, डॉ. नितीन डागा, प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, युसुफ मुल्ला, शत्रुघन जगदाळे, महादेव कुडकले आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ग्रामपंचायत, सुंदरवाडी, रोटरी क्लब, मुरूम व अंगणवाडी सेविका यांच्याकडून वाढदिवसानिमित्ताने पाटील सरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी डॉ. सूर्यवंशी म्हणाले की, सध्या समाजातील तरुण मंडळी वाढदिवसावर अनाठाई खर्च करतात. या खर्चाला फाटा देऊन प्रत्येक युवकांनी आपला वाढदिवस समाज उपयोगी कार्य करून साजरा करावा, असे आव्हान त्यांनी यावेळी केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी जाधव यांनी आमच्या गावातील अंगणवाडी बालकांमध्ये आपला वाढदिवस साजरा केल्याने निश्चितच गावकऱ्यांना प्रेरणा मिळाली.

आपण दिलेल्या शालेय साहित्यामुळे ही बालके आपला आदर्श निश्चित जोपासतील. यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. महेश मोटे यांनी रोटरीही जागतिक समाजसेवी संस्था असून ती सतत समाजासाठी काम करते. सत्काराला उत्तर देताना कलाप्पा पाटील म्हणाले की, माझ्या वाढदिवसानिमित्ताने मी अंगणवाडीतील बालकांना काहीतरी दिले पाहिजे या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोटरियन राजकुमार वाकडे, उपप्राचार्य कल्लाय्या स्वामी, प्रकाश रोडगे, मल्लिकार्जुन बदोले, प्रजावती हळळे, बेबीसरोजा सुरवसे, वंदना कोकणे, संगीता जाधव आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नितीन डागा यांनी केले. सूत्रसंचालन सहशिक्षक संतोष कांबळे तर आभार प्रा. भूषण पाताळे यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने पालक, अंगणवाडी सेविका, बालक-बालिका उपस्थित होत्या.






## पळसगाव शिवारातील ओढ्याच्या काठावरील वस्त्यांना पुराचा धोका



**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : पळसगाव शिवारा मध्ये रोजगार हमी योजनेतून जलसंधारण पाणी व्यवस्थापन सन २००३ साली पंडीत क-हे व सोपन क-हे यांच्या शेतात गट नं ११७ मध्ये बांधलेले आहे या धरणात तिसगाव शिवारातील पाणी या ओढ्याला मिळून मोठा पुर येतो मोठा पुर आल्यामुळे धरण फुटण्याची दाट शक्यता आहे.

सन २०२४ साली त्या जलसंधारण धरणाची पाळ फुटायला सुरूवात झाली होती तेव्हा ग्रामपंचायत कार्यालय पळसवाडी ग्रामसेवक यांना ग्रामस्थांनी तोंडी तक्रार दिली होती परंतु या तक्रारीवर काहीही हालचाल झाली नाही पाणी अडवा जलसंधारणाचा जल साठा जास्त आहे आणी सन २०२५ चालू वर्षी या धरणाची पाळ मोठ्या प्रमाणात फुटल्याने ओढ्याला लागून असलेल्या बोडखे वस्ती,सातदिवे वस्ती या वस्तीतील लोकांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो.

तरी पाळीची दुरुस्ती संबंधीत अधिका-यांनी गांभीर्याने दखल घेवून लवकरात लवकर चांगले करावे अशा भावना वस्तीतील लोकांनी व्यक्त केल्या आहेत सदरील माहिती तेथील स्थानीकांनी दिली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ सप्टेंबर २०२५


## जिल्हास्तरीय युवक महोत्सवात पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा संपन्न





**जालना :** नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवा महोत्सवात बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा नुकताच प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांच्याहस्ते संपन्न झाला. त्या म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी आपल्यातील सुप्त कलागुण कौशल्याचा उपयोग आयुष्याच्या जडणघडणीसाठी करावा.

स्वतः आनंद मिळवत समाजालाही आनंद मिळवून द्यावा.जालना जिल्हास्तरीय युवक महोत्सव विभागवार पारितोषिक:1) प्रथम पारितोषिक : पाश्चात्य सुगम गायन(सांघिक) सहभागी कलाकार: आकांक्षा पगारे, वैष्णवी कांबळे, सेहर हमदुले2) दुसरे पारितोषिक : पाश्चात्य सुगम गायन (वैयक्तिक) सहभागी कलाकार: सेहर हमदुले3) तिसरे पारितोषिक : भारतीय लोक/आदिवासी नृत्य (सांघिक)सहभागी कलाकार: यशराज बायस, तन्मयी शिंदे, वैष्णवी कांबळे, नेहा लोधवालगौरी पवार, ऋषिका आढेयावेळी सांस्कृतिक विभागाचे डॉ. निशिकांत लोखंडे, डॉ. रवींद्र भोरे, प्रा. कांचन कायंदे, डॉ. प्रेरणा रामटेके, प्रा. अभिजित भुतेकर यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## बद्रीनारायण बारवालेत महिको ग्रुप टेबल टेनिस स्पर्धा संपन्न




**जालना :** नुकत्याच संपन्न झालेल्या येथे महिको ग्रुप अंतर्गत गोल्डन जुबली स्कूल, श्री गणपती नेत्रालय, ग्रो इंडिगो कंपनी, महिको व बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय जालना च्या महिला व पुरुष संघाच्या टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात पार पाडल्या यामध्ये कर्मचाऱ्यांबरोबर विद्यार्थ्यांचाही समावेश होता. महिको ग्रुप मधील सर्व कर्मचाऱ्यांचे आरोग्य उत्तम राहावे तसेच विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेसाठी एक मंच मिळावा या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन केले जात असते.

स्पर्धेतील विजेते १ कर्मचाऱ्यांची मुले: पूर्वा नेमा प्रथम, वैद्य दिवरे द्वितीय, विराज हिंगे तृतीय. २ महिला संघ: गोल्डन जुबली स्कूल प्रथम दिमीरा अग्रवाल, आर्या मगरे, प्राची अग्रवाल, कनक मणियार व अनुश्री करवा.

बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय द्वितीय प्राची जाधव, निकिता पारे, सोम्या शिरसमकर व डॉ मोहिनी रायबागकर.३ मिश्र दुहेरी संघ बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय जालना प्रथम डॉ कुणाल देशपांडे व सौम्या सिरमकर, डॉ. निशिकांत लोखंडे व सारा मरियम, डॉ. रवींद्र शिंपी व डॉ. मोहिनी रायबागकर. गोल्डन जुबली स्कूल द्वितीय रवी कचरे व आर्या मगरे, माधव दाड दाड व दिमिरा अग्रवाल, दर्शील अग्रवाल व प्राची अग्रवाल.

४ पुरुष संघ महिको कंपनी प्रथम दीप रतन कुमार, अर्णव भालवणकर, संदीप सोनी व दत्ता इथापे. गोल्डन जुबली स्कूल संघ द्वितीय रवी कचरे, दर्शील अग्रवाल, अस्मित गोविंदा व माधव दाडस्पर्धा यशस्वी होण्यासाठी क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भिकूलाल सले, क्रीडा समितीचे रवींद्र शिंपी, डॉ. कुणाल देशपांडे, श्री. अभिषेक ढेबरे, श्री. सुधीर देशपांडे, डॉ. भारत उगले व श्री मिलिंद कुलकर्णी.

कार्यकारणी समितीचे रामेश्वर मस्के श्री विजय लोणकर , विनोद पवार, सुरेश खरात, काशिनाथ खलसे, अनिल जाधव व सतीश सोनवणे यांनी परिश्रम घेतले तसेच निखिल सुरसे, कुणाल काळे करण शेजवळ व आशिष नागरे यांनी पंचांची जबाबदारी सांभाळली.

## शैक्षणिक लेखन कौशल्य ही एक साधना असून वाचन, मनन आणि चिंतनातून ती आविष्कृत होत असते : प्रा.विवेककुमार यांचे प्रतिपादन



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** ज्ञान निर्मितीची प्रक्रिया पाहिजे तेवढी सोपी नाही. त्यासाठी सतत प्रयत्नरत असणे आवश्यक आहे. शैक्षणिक लेखन कौशल्य ही एक साधना आहे. वाचन, मनन आणि चिंतन यातून ती आविष्कृत होत असते. असे प्रतिपादन जे. एन. यू. दिल्लीचे प्रो. विवेककुमार यांनी केले.

स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालय आणि इंडियन सोशियॉलॉजिकल सोसायटी, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सामाजिकशास्त्रे संशोधन व शैक्षणिक लेखन' या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेत ते बोलत होते. पुढे ते म्हणाले की, आपण ज्यांच्यासाठी लिखाण काम करतो ते लेखन व्यापक आणि विश्लेषणात्मक स्वरूपाचे असावे. लिखाणाला वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आधार असावा.

असेच लिखाण काळाच्या कसोटीवर टिकते. आपण जे लेखन करते ते नवोपक्रम स्वरूपाचे असावे. ज्यातून समाजाला काहीतरी देता आले पाहिजे. यावेळी त्यांनी विविध समाजशास्त्रज्ञांच्या विचाराचा आधार घेत वैज्ञानिक आधारावरील लिखाणाचे कौशल्य कसे विकसित करावे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.सामाजिक शास्त्रातील संशोधनाच्या विविध पायऱ्या त्याचबरोबर संशोधन प्रकल्पाची निर्मिती व बांधणी, संशोधन पर लेख कसे लिहावेत याविषयीचे विविध पैलूंच्या संदर्भात त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या सामाजिक संशोधनाविषयीच्या विविध प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.कार्यशाळेचे संयोजक प्रा.डॉ. संदीप चौधरी यांनी वक्त्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. शुभम पाटील यांनी मानले. कार्यशाळेसाठी मोठ्या संख्येने संशोधक विद्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ सप्टेंबर २०२५


## हम होंगे कामयाब छोटे उस्ताद” बालकलावंतासाठी आयोजित



**छत्रपती संभाजीनगर :** हम होंगे कामयाब छोटे उस्ताद” बालकलावंतासाठी आयोजित राज्यस्तरीय प्रहसन (स्कीट) स्पर्धेत आदरणीय आयुक्त मा. श्री. जी. श्रीकांत साहेब यांच्या “स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल” उपक्रमांतर्गत मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथील विद्यार्थ्यांनी “आज्जी-आजोबांची वृद्धाश्रम भेट” या प्रहसनाद्वारे सशक्त व प्रभावी सादरीकरण करून द्वितीय क्रमांक पटकावला.

याच स्पर्धेत उत्कृष्ट नाट्य लेखन पुरस्कार वैयक्तिकरित्या श्रीमती अर्चना दामोदर पंडित यांना मिळाला. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी, श्रीमती मंगल निकम, प्रशिक्षक प्रा. श्री. अजय शेंडगे तसेच सर्व शिक्षकांनी मन:पूर्वक अभिनंदन केले.






## गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात ‘स्वस्थ नारी - सशक्त परिवार’ अभियानाचा शुभारंभ



**गंगापूर (मकसूद खान) :** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ‘स्वस्थ नारी – सशक्त परिवार’ या लोकाभिमुख व आरोग्यविषयक अभियानाचा शुभारंभ गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या अभियानाचे उद्घाटन भाजपा जिल्हा उपाध्यक्षा सौ. मनीषाताई व्यवहारे यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुदाम लगास, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सवई, रुग्ण कल्याण समिती सदस्य तथा भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अतुल रासकर, भाजपा तालुका अध्यक्षा शिलाताई गाडे, विशाखा समितीच्या कावेरीताई पाहुणे, आमदार बंब यांचे स्वीय सहाय्यक कृष्णकांत व्यवहारे, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस भगवान मगर, किरण निकम, डॉ. पवन मुंदडा, डॉ. अबसा सुबोही, डॉ. शिवाजी निकम, डॉ. विनायक टिके आदी मान्यवर उपस्थित होते.

या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे समाजातील महिलांच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण करणे, कुटुंब नियोजनाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि स्त्री सक्षमीकरणाला चालना देणे हे आहे. महिलांचे आरोग्य सक्षम असेल तर कुटुंब सक्षम होते आणि सक्षम कुटुंबातूनच सक्षम समाजाची निर्मिती होते, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

या उपक्रमांतर्गत रक्तदाब, मधुमेह, नेत्र, दंत, कर्करोग, प्रसुतीपूर्व तपासणी, हिमोग्लोबीन तपासणी, क्षयरोग तपासणी आदी विविध आरोग्य तपासण्या घेण्यात आल्या. याशिवाय लसीकरण, पोषणविषयक जनजागृती, निरोगी जीवनशैलीसंबंधी मार्गदर्शन तसेच एमसीपी कार्ड, आयुष्यमान वय वंदना कार्ड, लाभार्थी नोंदणी या सेवांवर विशेष भर देण्यात आला.“आजच्या बदलत्या जीवनशैलीत स्त्रियांचे आरोग्य हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. शासनाने हाती घेतलेला हा उपक्रम ग्रामीण व शहरी भागातील महिलांसाठी नक्कीच दिलासा देणारा व प्रेरणादायी ठरेल,” असे सौ. मनीषाताई व्यवहारे यांनी सांगितले.

या कार्यक्रमास डॉ. हर्षल धाबे, डॉ. शेजुळे, डॉ. म्हस्के, शरद साळुंके, अनिल साळुंखे, मंगेश गायकवाड, प्रफुल गायकवाड, नीलम गायकवाड, गीतांजली लोहकरे, नितीन पेंढारे, इंचार्ज टापसे, मुजमिल शेख, रुकसाना शेख, जयश्री कुलकर्णी, बेबी शेख, शिवाजी काळे, प्रणिती थोरात, स्नेहल दळेकर, मोईन शेख, वाघ सिस्टर, साधना गवई, आकाश घोडके, सोमनाथ सोनवणे, आकाश खंडागळे, गणेश कान्हे, विशाल जाधव, किशोर हिवाळे आदींची उपस्थिती लाभली.

सदरील शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. साजीद शेख, डॉ. विशाल सुर्यवंशी, डॉ. अफ्सा सुबोही, डॉ. सुनील शेजुळे, डॉ. शिवाजी म्हस्के, डॉ. विशाल ऊईके, डॉ. शितल वेणीकर, डॉ. शुभांगी कुदळे, डॉ. प्राची पाटील, डॉ. किरण शेवाळे, सपना पाटील, विद्या चेपटे, नीता खिल्लारे, वंदना सुलाने, रुबीया देशमुख यांच्यासह रुग्णालयातील वैद्यकीय व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## त्र्यंबकेश्वर पत्रकारांवरील हल्ल्याचा जाहीर निषेध दोषींवर कठोर कारवाई करावी शेतकरी कृती समितीची ग्रहमंत्र्याकडे मागणी

**त्र्यंबकेश्वर :** शेतकरी कृती समितीच्या वतीने राहुल ढोले पाटील इंजी.महेशभाई गुजर आण्णासाहेब जाधव यांनी ईमेल द्वारे मुख्यमंत्री तथा ग्रहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्र्यंबकेश्वर येथे वार्तांकनासाठी गेलेल्या झी 24 तासचे ब्युरो चीफ योगेश खरे, साम टीव्हीचे ब्युरो चीफ अभिजित सोनवणे आणि पुढारी न्यूजचे ब्युरो चीफ किरण ताजने या तिघा वरिष्ठ पत्रकारांवर स्वामी समर्थ केंद्राजवळील पार्किंगवर काम करणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांनी दगड, लाथा-बुक्के व शिवीगाळ करत भीषण हल्ला केला.

या हल्ल्यात किरण ताजने गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अपोलो रुग्णालयात तातडीने उपचार सुरू आहेत. पत्रकारांवर वारंवार होणारे असे हल्ले ही लोकशाहीला काळिमा फासणारी व चौथ्या स्तंभावर घाला घालणारी निंदनीय कृत्ये आहेत.

पत्रकार समाजासाठी, सत्यासाठी आणि लोकशाहीच्या बळकटीसाठी अहोरात्र काम करतात. अशा पत्रकारांवर गुंड प्रवृत्तीने केलेले हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत. शेतकरी कृती समिती च्या वतीने या घटनेचा जाहीर निषेध व्यक्त केला जात असून, प्रशासनाने संबंधित गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींवर तातडीने कठोरात कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात येत आहे.

आता तरी सरकार व प्रशासनाने पत्रकार सुरक्षेसाठी ठोस पावले उचलावीत, अन्यथा पत्रकार संघटना तीव्र आंदोलन छेडण्यास बाध्य होतील, असा इशारा देखील यावेळी देण्यात आला आहे.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ सप्टेंबर २०२५

# शिक्षिका निलोफर जहां सेवानिवृत्त



**छ. संभाजीनगर** - अल्लामा शिबली उर्दू प्राथमिक शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ. निलोफर जहां यांनी 33 वर्षांची अखंड शैक्षणिक सेवा बजावून नुकतेच सेवानिवृत्त होऊन शिक्षक सेवेला निरोप दिला. निलोफर मॅडम यांनी आपल्या सेवाकाळात शेकडो विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण देऊन त्यांच्यात नैतिक मूल्ये, संस्कार आणि ज्ञानाची पायाभरणी केली. त्यांच्या कार्यकाळात विद्यार्थ्यांना वाचन, लेखन व भाषिक विकासाबरोबरच सामाजिक जाणीवा निर्माण करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.सेवानिवृत्ती प्रसंगी आयोजित कार्यक्रमात मुख्याध्यापक, सहकारी शिक्षकवर्ग व विद्यार्थी यांनी निलोफर मॅडम यांच्या कार्याचे मन:पूर्वक कौतुक केले. त्यांच्या सेवेत असलेल्या समर्पण, आणि विद्यार्थ्यांविषयी असलेल्या ममत्वाची सर्वांनी उजळणी केली.कार्यक्रमाच्या शेवटी निलोफर मॅडम यांना पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

# स.भु. प्रशालेत 'एका दुपारची गोष्ट' रंगली




**छत्रपती संभाजीनगर :** येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेतील पूर्व माध्यमिक विभागाच्या साने गुरुजी कथामालेत कथाकार गेणू शिंदे यांचे कथाकथन रंगले. दुपारच्या सत्रात झालेल्या या कार्यक्रमात 'एका दुपारची गोष्ट' ही कथा गेणू शिंदे यांनी अत्यंत प्रभावी पद्धतीने सादर केली.

त्यावेळी वातावरणातही ऊनसावलीचा खेळ सुरु होता. कथा ऐकताना विद्यार्थी तल्लीन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समिती अध्यक्ष ज्ञानप्रकाश मोदाणी, उपमुख्याध्यापक अनिल देशमुख, पर्यवेक्षक विजय चापाईतकर, कथामला विभागाचे विनोद सिनकर अंजली कोलते उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला साने गुरुजींच्या प्रतिमापूजनानंतर 'खरा तो एकची धर्म' या प्रार्थनेचे सामूहिक गायन घेण्यात आले. कथामालेच्या आयोजनामागची भूमिका प्रास्ताविकातून विनोद सिनकर यांनी स्पष्ट केली. ज्ञानप्रकाश मोदाणी यांनी कथामालेची व्याप्ती राज्यभरच नव्हे तर देशभर वाढली पाहिजे, असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्रग्वी पाठक या विद्यार्थिनीने केले तर आभार प्रदर्शन गोजिरी कोसगावकर हीने केले.




# भानुदासराव चव्हाण महाविद्यालयाचे शालेय क्रिडा स्पर्धेत जिल्हा व विभागीय स्पर्धेत यश



**लोहारा :** भानुदासराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालय,लोहारा येथील विद्यार्थी चि.जन्मेजय मुकुंद जगताप यांची बॉक्सिंग या शालेय क्रीडा स्पर्धेत विभाग स्तरावर सुवर्णपदक पटकावले.त्याची महाराष्ट्र राज्यासाठी बॉक्सिंगसाठी निवड झाली आहे.

तसेच चि.श्रीधर क्षीरसागर यांची कुस्ती (ग्रीको,वजनी गट 55) या प्रकारात धाराशिव जिल्हातून निवड होऊन विभागासाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष श्री.सतीश इंगळे,प्राचार्य डॉ.रामदास ढोकळे, उपप्राचार्य प्रा.हनुमंत कलबुर्गे यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या विद्यार्थ्यांना प्रा.मुंडे मॅडम,प्रा.विनोद तुंगे यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ सप्टेंबर २०२५

# आनंद जीवनाचा



म्हणणारे म्हणत असतील
काय राव देवा तू
सगळं सुख यांच्याच झोळीत घातलं
बघणारे डोळे म्हणत असतील
मनात विचार करत असतील
लय सुखात आहे म्हणत असतील

दुःखाचे रडगाणे गाऊन गाऊन
दुःख थोडी संपणार आहे
दुःख संपून लगेच थोडी
सुखाने झोळी भरणार आहे
गालावर हसू खिळवून
क्षण तेवढा गुलाबी होणार आहे

जोपर्यंत आपण जिवंत आहे
तोपर्यंत ते शक्य नाही
जगण्यात आपण
आनंद शोधणार नाही
मरतानाही आपण
सुखाने मरणार नाही
सरण ही आपलं
चिंतेच्याच आगीत जळणार आहे

मरताना नशिबी सुख मिळेल
यावरही प्रश्नचिन्ह आहे
सुख दुःख म्हणजे
एकापाठोपाठ येणाऱ्या
कधी न संपणाऱ्या
अदलून बदलून येणाऱ्या
नियतीच्या फेऱ्या आहे

न बदलणारी स्थिती
आपण कोण बदलणारे
स्वतःसाठी जगलो
खळखळून हसलो
तोच खरा आनंद आहे
खरा आनंद घेण्यासाठी
रड गाण्याचा सूर थांबवत
दुःखातही हसण्याचा सूर लावू म्हणतो
ज्याला दुःखात खळखळून हसता येते
त्यालाच खरे जीवन जगता येते...

**लक्ष्मण वाल्डे**
कन्नड
छत्रपती संभाजीनगर
मो.नं-8888606068

# किनगाव राजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार संजय मातोंडकर यांचे वाळूमाफिया विरोधात मोठी कारवाई



**बुलढाणा (महेश मुंढे) :** किनगाव राजा ( जि.बुलढाणा ) पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध वाळू वाहतूक यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतोष आहे कारण भरधाव चालणारे टिप्पर व वाळूमाफीयांची दादागिरी या पार्श्वभूमीवर किनगाव राजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री संजय मातोंडकर यांनी पुन्हा एकदा अवैध्य वाळू वाहतूक व वाळूमाफिया विरोधात धडक कारवाई करत अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणून सोडले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की शनिवारी मध्यरात्री ठाणेदार साहेबांना गुप्त यंत्रणेद्वारे माहिती मिळाली की आज रात्री अवैध वाळू वाहतूक होणार आहे या माहितीच्या आधारे ठाणेदार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस यंत्रणेने सापळा रचला व दुसरबीड ता. सिंदखेड राजा येथे बस स्टॉप वर शनिवारी मध्यरात्री दिनांक २१- ९ -२०२५ ला पिवळ्या रंगाचे केबिन व राखाडी रंगाचे डाले असलेला अशोक लेलँड कंपनीचा टिप्पर क्रमांक एम एच २८ बी बी ८७९६ अंदाजे किंमत ८,००,०००/ रुपये व त्यामध्ये विनापरवाना अवैध रित्या चोरून नेत असलेली दोन ब्रास वाळू अंदाजे किंमत ६०००/ रुपये असा मुद्देमाल जप्त करून आरोपी क्र. १ अनंता तानाजी गाडे वय २७ वर्ष राहणार कल्याणा तालुका मेहकर व आरोपी क्र. २ प्रमोद गिरीधर ठाकरे वय ३४ वर्ष राहणार कल्याण तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा यांना कलम ३०३ (२) bns २०२३ सह कलम २१(१) २१(२) गौन खनिज अधिनियम अंतर्गत अटक करण्यात आली.

याची फिर्याद पो.का.संदीप तुळशीराम डोंगरे ब.न. ३८, पोलीस स्टेशन किनगाव राजा यांनी दिली व पुढील तपास ठाणेदार साहेब यांनी हे. का.विष्णू मुंडे ब.नं १२४५ पोलीस स्टेशन किनगाव राजा यांच्याकडे दिला आहे. तसेच शनिवारी मध्यरात्री दुसरी घटना किनगाव राजा गावात मारुती मंदिराजवळ घडली, मारुती मंदिराजवळ एक अज्ञात इसम त्याच्याजवळ असलेली मोटार सायकल क्र mh२१a४०५९ अंधारात उभी करून अंधाराचा फायदा घेत एखादा दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने गस्तीपथकावर असलेले स.फौ. रघुनाथ मुंढे पोलीस स्टेशन किनगाव राजा व पोलीस चालक यांचे नजरेस पडला सदर इसमाने शिवधर्म अरुण काकड वय ३० वर्ष रा. गारगुंडी ता. देऊळगाव राजा असे नाव सांगितले व उडवा उडवीची उत्तरे दिली.

त्यावर संशय आल्याने सहाय्यक फौजदार रघुनाथ मुंढे यांनी कलम १२२ म. पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून अटक केली व पुढील तपास हे.का.अनिल नागरे यांच्याकडे देण्यात आला आहे. ठाणेदार श्री संजय मातोंडकर यांच्या या कारवाई मुळे अवैध वाळूमाफिया व अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे या कारवाईमुळे पोलीस यंत्रणा कटीबद्ध असल्याचा स्पष्ट संदेश ग्रामस्थांना मिळाला आहे. स्थानिक ग्रामस्थांनी या कारवाईचे स्वागत केले असून पोलीस प्रशासनाचे व किनगाव राजा पोलीस स्टेशनचे सर्व पोलीस कर्मचारी यांचे मनोमन आभार मानले आहेत.

असेच सातत्याने प्रशासनाने लक्ष जर ठेवले तर अवैध धंदे करणाऱ्यांचा पूर्णतः बंदोबस्त होईल अशी प्रतिक्रिया ही व्यक्त केली आहे. किनगाव राजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री संजय मातोंडकर यांच्या नेतृत्वाखालील ही कारवाई परिसरातील अवैध वाळू माफीयांच्या विरोधातील व अवैध धंदे चालक यांच्या विरोधातील लढाईतील एक महत्त्वाचे पाऊल ठरली आहे.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २२ सप्टेंबर २०२५

# कर्मवीर भाऊराव पाटील : शिक्षण, सामाजिक समता आणि परिवर्तनाचा दीपस्तंभ



भारतीय समाजात विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विषमता अत्यंत तीव्र होती. जातपात, अंधश्रद्धा, अज्ञान आणि गरिबी यामुळे समाजातील बहुसंख्य जनतेला शिक्षण व प्रगतीपासून दूर ठेवण्यात आले होते. अशा अंधाऱ्या वातावरणात काही थोर समाजपुरुषांनी आपल्या कार्याने सामान्य माणसाला नवा मार्ग दाखविला. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, संत एकनाथ, महात्मा फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे या परंपरेतच पुढे कार्य केलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यांनी आयुष्यभर सामान्य शेतकरी, मजूर, गरीब, वंचित आणि बहुजन समाजातील मुलामुलींना शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष केला आहे. त्यांच्या शिक्षण चळवळीमुळे ग्रामीण महाराष्ट्रातील समाजजीवनात एक नवी क्रांती घडली आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूर संस्थानातील हातकणंगले तालुक्यातील कुंभोज या खेडेगावात झाला. शेतकरी कुटुंबात ते वाढले. घरची परिस्थिती गरिबीची होती. लहानपणीच त्यांनी शेतात बैल हाकणे, गुरे राखणे यासारखी कामे केली. परंतु त्यांच्यातील ज्ञानलालसा प्रखर होती. त्यांनी प्राथमिक शिक्षण गावात घेतले आणि पुढे सातारा व कोल्हापूर येथे शिक्षणासाठी गेले. कोल्हापूर संस्थानचे राजर्षी शाहू महाराज हे त्यांच्या आयुष्याचे प्रेरणास्थान ठरले. शाहू महाराजांनी शूद्र-अतिशूद्रांना शिक्षणाची दारे खुली केली होती, अस्पृश्यतेविरुद्ध लढा दिला होता. या विचारांचा खोल ठसा भाऊराव पाटील यांच्या मनावर बसला. 'शिक्षण हेच खरे मुक्तीचे साधन आहे' हा विश्वास त्यांनी मनाशी पक्का केला होता. भाऊराव पाटील यांनी शिक्षक म्हणून आपली कारकीर्द सुरू केली. परंतु लवकरच त्यांना जाणवले की केवळ अध्यापन पुरेसे नाही, तर गरीब मुलांना शिक्षणाची संधी मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर संस्थात्मक प्रयत्न करणे आवश्यक आहे. म्हणूनच १९१९ साली त्यांनी 'रयत शिक्षण संस्था'ची स्थापना केली. या संस्थेचा मूलमंत्र होता 'शिक्षण सर्वांसाठी, विशेषतः गरीब व वंचितांसाठी.' त्यांनी ठामपणे सांगितले की शेतकरी आणि कामगार यांच्या मुलांना शिक्षणाशिवाय अन्य कोणताही मुक्तीचा मार्ग नाही. या विचारातूनच रयत शिक्षण संस्थेची उभारणी झाली.

रयत शिक्षण संस्थेने सुरुवातीला फार मोठ्या प्रमाणावर साधनसंपत्ती नव्हती. भाऊराव पाटील स्वतः गावोगावी फिरून निधी मागत. लोकांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत. अनेक वेळा त्यांना अपमान सहन करावा लागला आहे, परंतु त्यांनी हार मानली नाही. 'शेतकऱ्याच्या घरात दिवा लावण्यासाठी माझ्या अंगावरचा झगा विकावा लागला तरी चालेल' अशी त्यांची तयारी होती. त्यांच्या या ध्येयवेडेपणामुळे हळूहळू समाजानेही त्यांच्या कार्याला पाठिंबा द्यायला सुरुवात केली. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी उभारलेली 'कमवा आणि शिका' योजना ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्यपूर्ण देणगी आहे. या योजनेत गरीब विद्यार्थी दिवसभरातील काही तास शेतात, बागेत, वसतिगृहात किंवा शाळेच्या कामात श्रम करीत आणि त्याबदल्यात थोडे पैसे मिळवीत. हे पैसे ते शिक्षणासाठी वापरत. यातून विद्यार्थ्यांमध्ये कष्टाची तयारी, स्वावलंबनाची जाणीव आणि श्रमाची प्रतिष्ठा ही मूल्ये रुजली जात होती. शिक्षण म्हणजे केवळ पैशाच्या जोरावर मिळणारे साधन नाही, तर श्रमाच्या मोबदल्यात मिळणारे पवित्र फलित आहे, ही जाणीव विद्यार्थ्यांना झाली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा दृष्टीकोन केवळ शिक्षणपुरता मर्यादित नव्हता. ते शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानत असत. त्यांच्या मते, शिक्षण घेतलेला विद्यार्थी समाजासाठी काम करणारा असावा. शेतकरी, कामगार, कष्टकरी यांच्या समस्या ओळखून त्यांच्यासाठी आवाज उठविणारा असावा. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यावर भर दिला. त्यांच्या शाळांतून घडलेल्या विद्यार्थ्यांनी नंतर समाजकारण, राजकारण, साहित्य, पत्रकारिता, विज्ञान आदी क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्यात स्त्रीशिक्षणाला विशेष महत्त्व होते. त्या काळात मुलींना शाळेत पाठविणे लाजिरवाणे समजले जात असे. परंतु भाऊराव पाटील यांनी समाजाच्या या चुकीच्या मानसिकतेला आव्हान दिले. त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केल्या, वसतिगृहे उभारली. स्त्रीशिक्षणाशिवाय समाजाची प्रगती शक्य नाही, हा त्यांचा ठाम विश्वास होता. या विचारामुळेच पुढे ग्रामीण भागातील मुलींनाही शिक्षणाची संधी मिळाली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा प्रभाव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिला नाही तर भारतभर पसरलेला आहे. आज या रयत शिक्षण संस्थेच्या शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, कृषी शिक्षण केंद्रे, व्यावसायिक शिक्षण संस्था अशा विविध शाखांतून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या शैक्षणिक चळवळीने गरीबांना ज्ञानप्रकाश दिला आणि समाजातील विषमता कमी करण्याचे कार्य केले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यात आपल्याला महात्मा फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा संगम दिसतो. फुले यांनी अस्पृश्यता व अज्ञानाविरुद्ध सुरू केलेली लढाई, शाहू महाराजांनी दिलेला सामाजिक न्यायाचा मंत्र, गांधीजींनी दिलेली श्रमप्रतिष्ठेची शिकवण आणि डॉ. आंबेडकरांचे समतेचे तत्त्वज्ञान हे सर्व भाऊराव पाटील यांच्या कार्यातून प्रत्यक्ष साकार झाले. म्हणूनच त्यांना खऱ्या अर्थाने 'कर्मवीर' ही पदवी बहाल झाली. त्यांच्या जीवनात अनेक अडचणी आल्या. आर्थिक संकटे, समाजातील प्रतिकार, रूढीपरंपरा, उपेक्षा यांनी त्यांना थांबवले नाही. अनेकदा त्यांना अपमान सोसावा लागला, परंतु त्यांनी आपल्या ध्येयापासून माघार घेतली नाही. ते म्हणत, "मी अपयशी झालो तरी चालेल, पण प्रयत्न सोडणार नाही." त्यांच्या चिकाटीमुळे आज त्यांच्या कार्याचे भव्य रूप महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत दिसते.

आज आपण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याकडे पाहतो तेव्हा जाणवते की त्यांनी घडविलेली चळवळ ही केवळ शिक्षणाची चळवळ नव्हती, तर ती सामाजिक समतेची चळवळ होती. त्यांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाशी जोडले. त्यांनी गरीबांच्या मुलांना शिक्षण देऊन त्यांना आत्मभान दिले. त्यांना समाजात आपले स्थान आहे, आपली किंमत आहे, हे पटवून दिले. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी समाजातील विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला.

आजच्या काळात त्यांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरतात. कारण आजही ग्रामीण भागात शिक्षणापासून वंचित असलेली अनेक कुटुंबे आहेत. लिंगभेद, आर्थिक विषमता, सामाजिक अन्याय हे प्रश्न अजूनही डोके वर काढत आहेत. अशा परिस्थितीत 'कमवा आणि शिका' ही योजना नव्या स्वरूपात राबविण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच स्वावलंबन, कष्टाची तयारी आणि समाजसेवा या मूल्यांना जपले पाहिजे. तंत्रज्ञानाच्या या युगात भाऊराव पाटील यांचा संदेश तितकाच लागू पडतो.

कर्मवीर भाऊराव पाटील हे नाव उच्चारले की डोळ्यांसमोर एक साधा, कष्टाळू, ध्येयवेडा आणि समाजासाठी जिवाची बाजी लावणारा माणूस उभा राहतो. त्यांनी राजकीय पदांची मोहिनी पत्करली नाही, संपत्ती जमवली नाही, परंतु सामान्य माणसाच्या जीवनात बदल घडविण्यासाठी आयुष्य खर्च केले. त्यांच्या शैक्षणिक चळवळीने लाखो घरांमध्ये ज्ञानदीप प्रज्वलित केला. त्यांच्या निधनानंतरही त्यांचे कार्य आजही तितक्याच जोमाने सुरू आहे. रयत शिक्षण संस्था आज ग्रामीण भागात शिक्षणाचा महासागर बनली आहे. या संस्थेच्या शाळा व महाविद्यालयांतून शिकलेली पिढी समाजाच्या विविध क्षेत्रांत आपले योगदान देत आहे. हे सारे भाऊराव पाटील यांच्या ध्येयवेडेपणाचे फलित आहे.

आज आपण त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करतो तेव्हा त्यांच्या कार्याचा केवळ गौरव न करता त्यांचे आदर्श आचरणात आणणे ही खरी त्यांना वाहिलेली आदरांजली ठरेल. शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करून देणे, स्त्रीपुरुष समानतेवर भर देणे, श्रमाची प्रतिष्ठा जपणे आणि समाजातील विषमता दूर करणे या त्यांच्या संकल्पना आजही मार्गदर्शक ठरतात.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२, ईमेल —**
**bagate.rajendra5@gmail.com**